फ्रेंचाईजी देणे आहे

AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED

Shree Masala

गुंतवणूक २.५ लाख फक्त

आमच्या नामांकीत कंपनीची संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे

--- आमची वैशिष्ट्ये ---

- ५ दिवसात व्यवसाय सुरू
- कमी भांडवल जास्त नफा
- स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
- कुणीही हा व्यवसाय करु शकते
- सहज, सरळ व सोपा व्यवसाय
- तुम्हाला काहीही बनवायचे नाही
- ग्राहकांची वाढती मागणी
- आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...

संपर्क : ८०८०४९१८६९

दैनिक

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे Email : newsaksharaj2021@gmail.com

महा.-४४६/२०१०एफ११२६३ स्थापना : २०११

संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043

संत नामदेव महाराज शेलगाव(जं.)

श्री संत नामदेव महाराज

(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)

ता.- कळंब जि.- धाराशिव

* संस्थेचे मुख्य कार्य *

१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)

कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव

अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

वर्ष ०१ ले • अंक १८३ वा • पाने ०४ • ठाणे, सोमवार, दि.२२ एप्रिल २०२४ • किंमत : ३ रुपये • RNI NO.: MAHMAR/2022/82056

गणपती बाप्पा मोरया । मंगलमूर्ती मोरया ।।

पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पाचे आजचे विलोभनीय दर्शन

ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्।

दाढी वाढवली म्हणजे, कोणी दिघे साहेब होत नाही : खा. राजन विचारे

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, ठाणे : कोणी दाढी वाढविली म्हणजे दिघे साहेब होत नसतो. दिघे साहेब हे व्यक्तीमत्त्व एकदाच होऊन गेले. त्यांची ड्युप्लिकेटगिरी करून कोणाला दिघे साहेब होता येणार नाही. त्यासाठी तशी कामे करावी लागतात. अशी टीका शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार राजन विचारे यांनी केली. राजन विचारे यांनी त्यांच्या इन्टाग्राम या समाजमाध्यमावर मुलाखतीचा काही भाग प्रसारित केला आहे. त्या मुलाखतीमध्ये त्यांनी टीका केली आहे.

शिवसेना आणि ठाणे शहर हे वेगळे समीकरण आहे. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांनी तळागाळातील अनेक शिवसैनिकांना घडविले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार राजन विचारे हे त्यापैकी आहेत. या दोघांनाही ठाण्यात आनंद दिघे यांचे शिष्य मानले जाते. आनंद

दिघे यांच्या निधनानंतर काही वर्षांनी ठाण्यातील शिवसेनेची सुत्र एकनाथ शिंदे यांच्याकडे आली होती. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली आहे. तर खासदार राजन विचारे हे अद्यापही उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहे. राजन विचारे यांना उद्धव ठाकरे यांनी ठाणे लोकसभा निवडणूक लढविण्याची पुन्हा एकदा संधी दिली आहे.

तर दुसरीकडे महायुतीचा ठाणे लोकसभेचा उमेदवार ठरलेला नाही. असे असले तरी राजन विचारे यांनी ठाणे, नवी मुंबई आणि मिरा भाईंदर शहरात नागरिकांच्या गाठीभेटी घेण्यास सुरू केल्या आहेत. तसेच समाजमाध्यमांचा वापरही करण्यास सुरूवात केली आहे. काही म हिन्यांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदेश बांदेकर यांनी खासदार राजन विचारे यांची मुलाखात घेतली होती. या मुलाखतीमध्ये आदेश बांदेकर यांनी एक प्रश्न विचारला होता. 'काहीजण आपण दिघे साहेबांचे खरे पट्टशिष्य आहोत असे म्हणतात नेमकी परिस्थिती काय? असे बांदेकर यांनी राजन विचारे यांना विचारले. त्यावर उत्तर देताना राजन विचारे म्हणाले की, दाढी वाढविली म्हणजे, दिघे साहेब होता येत नाही.

दिघे साहेब हे व्यक्तीमत्त्व एकदाच होऊ शकते. असे व्यक्तीमत्त्व पुन्हा होऊ शकत नाही. दाढी वाढवून, चेहरे बदलून डुप्लिकेटगिरी करून, दिघे साहेब किंवा बाळासाहेब होता येत नसते. त्यासाठी तशी कामे करावी लागतात. असा टोला त्यांनी लगावला आहे.

मुंबईच्या पाणीसाठयात दिवसेंदिवस घट जलसाठा २२.६१ टक्क्यांवर

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, मुंबई : वाढणाऱ्या तापमानाबरोबरच मुंबईकरांना पाणी पुरवणाऱ्या जलाशयांतील पाणीसाठा झपाटयाने कमी होत आहे. आजघडीला धरणांत केवळ २२.६१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे धरणांमधील सुमारे तीन लाख २७ हजार २८९ दशलक्ष लिटर आणि राखीव जलसाठा पावसाळयापर्यंत पुरवून वापरावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर पाणीकपात लागू करणे आवश्यक असतानाही मुंबई म हापालिका चालढकल करीत आहे.

मुंबईकरांना अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात धरणांमधून दररोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस पडल्यामुळे धरणांमध्ये वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा होता. मात्र, धरणांतील साठा वेगाने कमी झाल्याने अप्पर वैतरणातील ९१ हजार ३०० दशलक्ष लिटर आणि भातसातील एक लाख ३७ हजार दशलक्ष लिटर अतिरिक्त राखीव पाणी उपलब्ध झाले आहे. पालिकेच्या २० एप्रिलच्या आकडेवारीनुसार सातही धरणांमध्ये तीन लाख २७ हजार २८९ दशलक्ष पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, भविष्यात उन्हाळयामुळे धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन होऊन साठा खालावण्याची शक्यता आहे.

'मे' मध्ये निर्णय?

पावसाळा सुरू होईपर्यंत धरणांतील उपलब्ध साठा आणि राखीव साठयातील पाण्याचे नियोजन करूनच पाणी पुरवावे लागणार आहे. मात्र मे महिन्यात धरणांतील जलसाठयाचा आढावा घेऊन पुरवठयाचे नियोजन करण्यात येईल. त्यावेळच्या परिस्थितीनुसार पाणीकपात करायची का, किती टक्के करायची? जलतरण तलावांच्या पाणी वापरावर निर्बंध घालायचे का, याबाबत मे मध्ये निर्णय घेण्यात येईल, असे जल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

थोडक्यात

आमदार रईस शेख यांचा राजीनामा मागे !

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, ठाणे : समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी शनिवारी आम दारकीचा राजीनामा पक्षाकडे सादर केला होता. अवघ्या काही तासांत त्यांनी राजीनामा मागे घेत असल्याचे जाहीर केले. पक्षात काही दलाल असून त्यांना ओळखून त्यांची हाकालपट्टी करा अशी मागणी त्यांनी अबू आसिम आझमी यांच्याकडे केली. पक्ष विस्तारासंदर्भात मांडलेल्या म ुद्यावर पक्षाकडून कार्यवाही होत नसल्याचे सांगत रईस शेख यांनी शनिवारी आमदारकीचा राजीनामा दिला होता. रईस शेख यांच्या राजीनाम्यानंतर भिवंडीत रईस शेख यांच्या समर्थकांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले होते. तसेच शेख यांनी राजीनामा मागे घ्यावा अशी मागणी करण्यास सुरूवात केली होती. रात्री उशीरा रईस शेख यांनी भिवंडीत आले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. त्यांनी पक्षातील काही नेत्यांवर गंभीर आरोप केले. भिवंडी ही समाजवादी पक्षाची आहे. मी कधीही पक्ष सोडणार

नाही. परंतु पक्षातील दलालांची हाकलपट्टी करावी अशी मागणी आझमी यांच्याकडे केली. पक्षाला दलालांच्या ताब्यात द्यायचे नाही. ही निवडणूक पैशांच्या जोरावर होणार नाही. हे वक्तव्य दलालांना खटकले होते. कारण, भिवंडीत पैशांचे समीकरण झाले नाही तर यांची घरे कशी चालणार? त्याम ुळे दलालांच्या पोटात दुखायला लागले. अशा दलालांना अबू आझमी ओळखतात. आझमी हे त्यांना लाथ मारून बाहेर काढतील असेही शेख म्हणाले. मी कार्यकर्ते आणि जनतेच्या पुढे जाणार नाही. त्यामुळे मी राजीनामा मागे घेत आहे. भिवंडीला दलालांपासून मुक्त केले जाईल असा दावाही त्यांनी केला.

सुजय विखेंचा उमेदवारी अर्ज आज भरणार मुख्यमंत्री शिंदे, फडणवीस, पवारांची उपस्थिती

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२१, अहमदनगर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज (दि.२२) रोजी डॉ. सुजय विखे उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती भाजप शहर जिल्हाध्यक्ष ऍड. अभय आगरकर यांनी दिली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून मिरवणुकीने विखे हे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचणार आहेत. भाजपचे उमेदवार डॉ. सुजय विखे हे विजयाचे प्रमुख दावेदार मानले जात असल्याने त्यांच्या उमेदवारी अर्जाकडे महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे. आज सोम वारी सकाळी ११ वाजता डॉ. सुजय विखे पाटील हे जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करणार आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,आ. मोनिका राजळे,आ. राम शिंदे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले,आ. बबनराव पाचपुते,आ. संग्राम जगताप, माजी आ. चंद्रशेखर कदम, माजी आ. चंद्रशेखर घुले, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नहाटा, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष बाबुशेठ टायरवाले, अनिल शिंदे यांच्यासह सर्व मित्र पक्षाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. नगरमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून खा. सुजय विखेंच्या मिरवणुकीला सुरुवात होणार आहे.

माळीवाडा वेस येथून विशाल गणपतीचे दर्शन घेत,पांचपीर चावडी मार्गे माणिक चौक,भिंगारवाला चौक,तेलीखुंट, चितळे रोड, दिल्लीगेट ते निलक्रांती चौक येथे मिरवणुकीची सांगता होईल. भाजप महायुती आणि घटक पक्ष, मित्र, पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी दिली.

एकनाथ खडसेंच्या भाजपा प्रवेशावर शरद पवार म्हणाले...

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, जळगाव : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, आमदार एकनाथ खडसे यांची लवकरच भाजपात घरवापसी होणार आहे. यासंदर्भात एकनाथ खडसे यांनी स्वत: माध्यमांना माहिती दिली होती. दोन वर्षांपूर्वी एकनाथ खडसे यांनी भाजपामधून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला होता.

त्यानंतर त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेची आम दारकीही देण्यात आली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे हे भाजपात जाणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत्या. या चर्चांवर बोलताना एकनाथ खडसे यांनी आपण लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याचे सांगितले होते.

या सर्व घडामोडीनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे जळगाव दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी यांनी माध्यमांशी बोलताना एकनाथ खडसे यांच्या भाजपा प्रवेशासंदर्भात भाष्य केले. एकनाथ खडसे यांच्यावर नाईलाजाने निर्णय घेण्याची वेळ आली असावी, असे शरद पवार म्हणाले. शरद पवार काय म्हणाले?

एखाद्या व्यक्तीवर व्यक्तिगत टीका करण्याची भूमिका याआधी महाराष्ट्रात कधीही नव्हती. मात्र, ती आता सुरु

झाली आहे. त्यामधून अनेकांना यातना सहन कराव्या लागत आहेत. कदाचित ही अवस्था एकनाथ खडसे यांच्यावरदेखील आली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर नाईलाजाने काही निर्णय घेण्याची वेळ आली असावी, असा माझा समज आहे. एकनाथ खडसे यांच्यावर तपास यंत्रणांचा दबाव आहे, असे शरद पवार म्हणाले.

खडसेंनी राष्ट्रवादीचा राजीनामा दिला का?

एकनाथ खडसे हे सध्या राष्ट्रवादीत आहेत. मात्र, ते लवकरच भाजपात जाणार आहेत. यासंदर्भाने त्यांनी राष्ट्रवादीचा राजीनामा दिला आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला असता शरद पवार म्हणाले, मला याबाबत माहिती नाही.

जयंत पाटील यांना माहिती असेल. ते संघटनेचे काम पाहतात. या भागात ज्यांचा प्रभावीपणे काम करण्याचा लौकीक आहे. त्यामध्ये एकनाथ खडसे देखील आहेत. म ात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस आणि ठाकरे गटातील कार्यकर्त्यांमध्ये नेतृत्व करण्याची क्षम ता आहे. त्यामुळे सर्वांच्या प्रयत्नाने कोणाचीही उणीव आम्ही भरुन काढू, असेही शरद पवार म्हणाले.

युवा नेतृत्व, दमदार कर्तृत्व !

सुरेंद्र बापुसाहेब पठारे

ज्या माणसाने माणसाच्या सेवेसाठी हाती वसा घेऊन कार्यरत होण्यासाठी, प्रयत्न करून, कष्ट करून सेवा मुल्य भक्तीचा वसा आणि ठसा उमटवला त्याचे कर्तृत्व हिऱ्यासारखे चमकते.सेवाभावी वृत्तीने काम करत असताना तेजस्वी झळाळी प्राप्त होते. त्यांची ओळख कधी कधी सुर्या सारखीच तेजोमय नव क्षितिजे खुणावू लागली जाते.

सुरेंद्र बापुसाहेब पठारे या युवकाने आपली ताकद सेवाभावी सामाजिक, शैक्षणिक, सहकार, औद्योगिक क्रांती, क्रिडा, युवक संघटन आणि मैत्री पुर्ण सामाजिक कार्यकर्ते संस्था पदाधिकारी मित्र परिवार स्नेही हितचिंतक वैचारिक मित्र मंडळ सार्वजनिक उत्सवाचे आयोजन आणि अशा तमाम क्षेत्रात झोकून देऊन लढायला सिद्ध करत कार्यरत आहेत. त्यांच्या क्रांतिकारक कृती आराखडा आणि सुधारित पद्धतीने आधुनिक मैत्री पुर्ण सामाजिक स्थिती वलयांकित आहे, हे जाणून त्यांच्यायशोगाथेस सलाम...

सुरेंद्र बापुसाहेब पठारे यांच्या युवा नेतृत्वावर अनेक तरुण, सहकारी मित्र मंडळ त्यांचे विचार कृतीच्या मुळाशी जोडले आहे आणि काम करणारा आपला माणूस म्हणून त्यांचा स्वभाव आणि कृती मधुनत्यांच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. तरुण, दमदार कर्तृत्व सिद्ध करत, कृती मधुन सुरेंद्र बापुसाहेब पठारे यांच्या नावलौकिक दिवसेंदिवस वाढतच आहे. अशा सामाजिक स्थिती वलयांकित नेतृत्वाखाली काम करत सम ाजातील विविध घटकांना सामावून घेत कार्यकर्त्यांना सोबतीला घेऊन त्यांची आजवर वाटचाल सुरू आहे.

अशा या सच्च्या, दिलदार, कर्तृत्ववान, युवा, दमदार नेतृत्वाला पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

संपादकीय

नव्वदीतला लोकसेवक

महाराष्ट्राच्या राजकारणात भारतीय जनसंघ व पुढे भाजपमध्ये तीन 'रामभाऊ' ख्यातकीर्त झाले. स्व. रामभाऊ म्हाळगी, स्व. रामभाऊ कापसे व अलीकडच्या काळात पद्मभूषण म्हणून ज्यांचा सन्मान झाला ते रामभाऊ नाईक. या तिघांतील समान विशेष असा की, सुरुवातीस महाराष्ट्र विधानसभेत आमदार आणि नंतर संसदेत खासदार म्हणून ते निवडून गेले आणि तिघांनीही आपली राजकीय व संसदीय कारकीर्द गाजविली. यातील दोन रामभाऊ (म्हाळगी व कापसे) आज हयात नाहीत. रामभाऊ नाईक १६ एप्रिल रोजी वयाची तब्बल ९० वर्षे पूर्ण करीत आहेत.

रामभाऊंचा जन्म १९३४ मध्ये सांगलीतील आटपाडी गावी झाला. तेथे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते पुणे येथून वाणिज्य पदवीधर झाले व पुढे मुंबईतून कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एका खासगी कंपनीत त्यांनी नोकरी पत्करली. बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी त्यांचा संबंध राहिला. ते मुंबईत गोरेगाव येथे स्थायिक झाले आणि १९६० पासून राजकारणात सक्रिय झाले. १९६९ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी जनसंघाचे पूर्णवेळ काम करण्यास सुरुवात केली. सुरुवातीस मुंबईचे संघटन सचिव आणि मग १९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यानंतर मुंबई भाजपचे ते पहिले अध्यक्ष झाले. भाजपच्या मुंबईतील प्रथम राष्ट्रीय अधिवेशनात ते संयोजक होते. मुंबईत भाजपचे संघटनात्मक कार्य वाढण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. १९७८ मध्ये बोरिवलीमधून ते आमदार म्हणून प्रथम निवडून आले. तीन वेळा आमदार व पुढे उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून सलग पाच वेळा खासदार म्हणून निवडून येण्याचा त्यांचा विक्रम नोंद घेण्याजोगा.

रामभाऊंच्या राजकीय प्रवासात जनतेने त्यांची विविध रूपे पाहिली. पक्ष कार्यकर्ता, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रशासन कुशल केंद्रीय मंत्री व उत्तर प्रदेशचे राज्यपालपद अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. त्या निभावताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचे दर्शन कार्यकर्त्यांना व जनतेला घडले. सार्वजनिक जीवनात रामभाऊंनी स्वत:चा वैशिष्ट्यपूर्ण ठसा निर्माण केला.

डॉ. हेडगेवार, स्वा. सावरकर, पं. दीनदयाळ उपाध्याय, रामभाऊ म्हाळगी हे त्यांचे आदर्श होत. स्व. रामभाऊ म्हाळगी यांनी संसदीय लोकशाहीतील लोकप्रतिनिधित्वाचा आदर्श जनतेपुढे ठेवला. तीच परंपरा रामभाऊ नाईक यांनी आपल्या संसदीय जीवनात चालू ठेवली. म्हाळगींचा वारसा सांगणारे त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे लोकप्रतिनिधी हा लोकांना नेहमीच उत्तरदायी असला पाहिजे या भूमिकेतून प्रतिवर्षी मतदारांना आपल्या कामाचा अहवाल सादर करण्याची त्यांनी काटेकोरपणे जोपासलेली परंपरा! लोकसभेत सदस्य असताना रामभाऊ 'लोकसभा में राम नाईक' अशा शीर्षकाने अहवाल प्रकाशित करत. पण पुढे अतिशय अनपेक्षितपणे लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. त्यानंतरही त्यांनी 'लोकसेवा में राम नाईक' या नावाने आपल्या माजी व भावी मतदारांविषयी असलेली आपले उत्तरदायित्व पाळणे सुरूच ठेवले. पुढे ते उत्तर प्रदेशचे राज्यपाल झाल्यावरही त्यांनी या परिपाठात खंड पडू दिला नाही.

रामभाऊंची मला ओळख झाली ती माझ्या शालेय जीवनात. तो काळ होता बॅरिस्टर अंतुले मुख्यमंत्री असतानाचा. १९७८ मध्ये रामभाऊ बोरिवलीतून आमदार म्हणून निवडून आले होते. बोरिवलीत आम्ही अभिनव नगरात स्वतंत्र प्लॉट घेतला होता. या वसाहतीत आठ-दहा प्लॉटचे एक युनिट होते. युनिटमधील सभासदांनी आपापली घरे स्वत: बांधण्याची पद्धत होती. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या सामग्रीत सिमेंट हा महत्त्वाचा घटक. त्या काळी सिमेंटची खूप टंचाई होती. सरकारी कोटयात सिमेंट मिळत असे, पण ते मिळवणे जिकिरीचे असे. बाहेर काळया बाजारात सिमेंट घेणे ही गोष्ट आवाक्याबाहेरची. आमच्या युनिटमधील सर्व सभासद एकत्र जमले. सिमेंट मिळविण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करता येतील याचा विचार झाला. रामभाऊ त्याच वेळी सिमेंट समितीचे सदस्य होते. माझ्या वडिलांनी रामभाऊंशी संपर्क साधून आपण सिमेंट मिळविण्याचे प्रयत्न करू, अशी कल्पना मांडली. इतर सभासदांनी ही कल्पना उचलून धरली परंतु सरकारी यंत्रणेस पैसा चारल्याशिवाय आपल्याला सिमेंट मिळूच शकणार नाही, असे सभासदांचे मत होते. माझ्या वडिलांना मात्र रामभाऊंना भेटल्यावर आपले काम निर्धोकपणे होईल असा विश्वासच नव्हे तर खात्री होती. वडील रामभाऊंना भेटले. रामभाऊंनी क्षणाचाही विलंब न करता सिमेंट समितीचा सदस्य या नात्याने उचित अधिकाऱ्यांना पत्र दिले. त्याचा लाभ असा झाला की आम्हास जास्तीचा एक नया पैसा खर्च न करता सरकारी किमतीतच (रु.२५/- प्रति गोण) सिमेंट उपलब्ध झाले.

साधी राहणी, सचोटी, भपकेबाजपणाचा लवलेश नाही, स्वच्छ पेहराव, वेळ पाळणे ही रामभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. हाती घेतलेले काम व्यवस्थितपणे व निर्दोष करण्याचा त्यांचा आग्रही स्वभाव आहे. कार्यक्रमाची आखणी करणे, योजना करणे, कार्यवाही करणे व कार्यक्रमानंतर त्याचा पाठपुरावा करणे, ही कोणत्याही कार्यक्रमाच्या यशस्वी व्यवस्थापनाची चतु:सूत्री आहे. संघ पठडीत यांस कार्यक्रमाची पूर्वतयारी व पूर्णतयारी करणे म्हणतात. अशा व्यवस्थापनात रामभाऊ वाकबगार आहेत.

मुद्रित शोधन हा काहीसा कंटाळवाणा प्रकार, परंतु रामभाऊंच्या सान्निध्यात आलेल्यांना याची नेहमी प्रचीती येते. कार्यालयीन पत्रकापासून पार्टीच्या प्रकाशनात छापला जाणारा प्रत्येक शब्द वा मजकूर शुद्ध व निर्दोष असला पाहिजे, असा त्यांचा नेहमीच कटाक्ष राहिला आहे.

कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण वर्गात व अन्य कार्यक्रमांत रामभाऊ नेहमी सहभागी होतात. प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शक वक्ता म्हणून सहभागी होताना रामभाऊ उशिरा आलेत असे ऐकिवात नाही. दिलेली वेळ व शब्द पाळणे हा त्यांचा खाक्या तसेच पूर्वतयारीशिवाय रामभाऊंनी विषयमांडणी केली, असे कधी घडले नाही. रामभाऊंच्या डायरीत एखाद्या कार्यक्रमाची नोंद झाली तर त्यांना कार्यक्रमाचे पुन्हा स्मरण करण्याची गरज भासत नाही. कार्यक्रमाच्या ५-१० मिनिटे आधी ते नक्कीच पोहचणार, रामभाऊ म्हणजे वेळेचे व्यवस्थापन व शिस्त याचा वस्तुपाठ आहेत. आजच्या राजकारण्यांत हा गुणविशेष क्वचितच सापडतो.

रामभाऊंचा स्वभाव मैत्री करण्याचा आहे त्यामुळे केवळ भाजपमध्येच नव्हे तर पक्षाच्या बाहेरील अनेक जणांशी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध आहेत. ते लोकप्रिय आहेत. यांत रेल्वे हमालापासून अन्य राजकीय पक्षांतील नेतेमंडळी, सामाजिक कार्यकर्ते ते उद्योगपतींपर्यंत अनेकांचा समावेश आहे. एकदा मला रामभाऊंबरोबर दिल्लीपर्यंत प्रवास करण्याचा योग आला. त्या वेळी ते खासदार वा मंत्री नव्हते. आम्ही मुंबई सेंट्रल स्थानकात राजधानी एक्सप्रेसमध्ये बसलो होतो. गाडी सुटायला सुमारे अर्धा तास होता. या वेळेत रेल्वेच्या स्टेशन मास्तरापासून ते हमालापर्यंत अनेकजण रामभाऊंना भेटून गेले. सर्वांनी रामभाऊंची खुशाली विचारली. त्यांच्या सर्वांशी असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांचे एक वानगीदाखल उदाहरण.

।। संकट ते श्री हनुमान छुडावे... ।।

हनुमान जयंती म्हणजे हिंदू देवता हनुमान यांचा जन्मोत्सव होय. चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार कीर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो. यावर्षी २३ एप्रिल रोजी हनुमान जन्मोत्सव आहे.

महाराष्ट्रात शनिवार, तर इतर भारतात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूर्वापार चालत आलेली आहे.ॐ हं हनुमते रुद्रात्मकायं हुं फट्. हा हनुमंताचा प्रभावी मंत्र आहे. हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी, जेव्हा जेव्हा रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. अनेकांना याची प्रचिती आली आहे. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले. मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात दरम्यान अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता.

झोपलेल्या मारूतीच्या मूर्ती काही ठिकाणी आहेत.

भारतात अशा आठ मूर्ती आहेत :

१. भद्रा मारुती (खुलताबाद येथील घृष्णेश्वराच्या जवळ). **२,** अलाहाबादेत यमुनेच्या तीरावर (संगम घाटावर) **३,** मध्य प्रदेशात जाम सावली येथे **४.** राजस्थानम ध्ये अलवर येथे **५.** राजकोट **६.** इटावा जिल्ह्यात पिलुआ गावात **७.** चांदोली जिल्ह्यात आणि **८.** छिंदवाडा येथे.

मारुती स्तोत्र हे मारुती तथा हनुमान या हिंदू देवतेची स्तुती करणारे काव्य होय.

या स्तोत्राची अनेक रुपे आहेत. त्यांपैकी समर्थ रामदासांनी लिहिलेले स्तोत्र महाराष्ट्रात प्रचलित आहे. याची सुरुवात भीमरूपी महारुद्र वज्र हनुमान मारुती या पंक्तीने होते.

हनुमान चालीसा हे हिंदी भाषिक राज्यात लोकप्रिय असलेले, हनुमानाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रात ४० कडवी आहेत,. श्री गोस्वामी तुलसीदास यांनी श्री हनुमान चालीसाची रचना १६ व्या शतकात केली. हे स्तोत्र दोहा आणि चौपाई स्वरूपातील ४० श्लोकांचे आहे, म्हणून तिला चालीसा असे म्हणतात. घरोघरी मारुती स्तोत्र आणि हनुमान चालीसा याचे रोज पठण होत असते.

समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूर मध्ये ११ ठिकाणी मारुतीच्या मूर्त्यांना स्थापित केले. समर्थ रामदास स्वामी यांनी रचलेले भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती हे मारुती स्तोत्र महाराष्ट्रात प्रमुख स्तोत्र म्हणून म्हटले जाते. साधारणपणे दोन दिवसात या ११ मारुती रायाचे दर्शन घेता येते.

कुठे आहे हे ११ मारुती ? बघूया.

चाफळचा वीर मारुती / प्रताप मारुती /भीममारुती

सातारा कराड चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे रामाच्या देऊळासामोरी हात जोडून उभा दास मारुती आणि त्याच देऊळाच्या मागे प्रताप मारुतीची कृष्ण नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग पासून बनवलेलीही मूर्ती स्थापिली आहे. ६ फुटी ही उंच मूर्ती रामाच्या समोर हात जोडून उभारल्या या मूर्तीचे नैत्र श्रीरामाच्या चरणाकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या रामाच्या देऊळाच्या मागे रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतायगत आहे. या देऊळातली मारुतीची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्या सारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यातून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मुर्त्यांची स्थापना रामदासांनी केली असून दोन्ही मूर्तीचे रूप वेगवेगळे आहे.



माजगावचा मारुती

चाफळपासून ३ कि.मी. लांब एक गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थानी मारुतीचे रूप दिले. ५ फुटीची मूर्ती चाफळच्या राम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती विटाच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.

शिंगणवाडीचा मारुती / खडीचा मारुती / बालमारुती

यालाचाफळचा तिसरा मारुती देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळ पासून १ कि.मी. च्या अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थानी मारुतीची छोटीशी सुबक मूर्तीची स्थापना केली. ४ फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व ११ मारुतीच्या देऊळात हे सर्वात लहान देऊळ आहे. आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहे. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.

उंब्रजचा मारुती / मठातील मारुती

चाफळचे २ आणि माजगावातील मारुतीचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर इथे जवळच ३ मारुती आहे. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुती. असंही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानेसाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयं हनुमंतानेच वाचविले होते. समर्थांना उंब्रज मधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तिथे समर्थानी मारुतीच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीची देखणी मूर्ती आहे. ह्या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.

मसूरचा मारुती

उंब्रजपासून १० कि.मी. असलेले मसूर येथे मारुतीची स्थापना केली आहे. ५ फुटीची चुन्यापासून बनवलेलीही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवं, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. सहा दगडी खांब्यावर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप १३ फूट लांबी रुंदीचा आहे.

शिराळ्याचा मारुती

सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव शिराळे याचा एसटी स्टॅन्डजवळ हे मारुतीचे देऊळ समर्थानी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीची मूर्ती अतिशय भव्य आहे. ७ फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनवलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्याम ध्ये घंटा बसविण्यात आला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजवी आणि डाव्या बाजूस झरोके आहे ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्राकाराला दक्षिण दिशेस दार आहे.

शहापूरच्या मारुती

कराड मसूर रस्त्यावर १५ कि.मी. च्या अंतरावर मसूरपासून ३ कि.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून १ कि.मी. लांब हे मारुतीचे देऊळ आहे. ११ मारुती मधल्या मारुतीमध्ये सर्वात पहिले या मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला चुन्याचा मारुती देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकांवर नदीच्या काठाला मारुतीचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. ७ फुटाची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून २ दगडी रांजण दिसतात ह्याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असायचे.

बहे बोरगावचा मारुती

सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावा जवळ बोरगांवामुळे त्याला बहे बोरगाव म्हटले जाते. इथल्या मारुतीच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतांना इथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णानदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतं तेव्हा मारुतीने आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले. आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले.

या जागी मारुतीचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात डोक्यावर मुकुट हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. इथे जाण्यासाठी कृष्णानदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास इथे जाणे शक्य नसते.

मनपाडळेचा मारुती

मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड -ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे १४ कि.मी.च्या अंतरावर हे मनपाडळे आहे. ११ मारुती पैकी सर्वात दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुती देऊळाची स्थापना समर्थानी केली ५ फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्ती जवळ दीडफुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.

पाडळी मारुती

वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाच्या जवळच पाडळी गावात मारुतीची मूर्ती आहे.

पारगावाचा मारुती

यालाच बाळमारुती किंवा समर्थांच्या झोळीतला मारुती असे म्हणतात. कराड- कोल्हापूर रस्त्यावर वाठार गाव जवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीची मूर्ती आहे. ११ मारुतींपैकी शेवटची आणि सर्वात लहान अशी ही मूर्ती सपाट दगडवर कोरलेली दीड फुटीची मूर्ती आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर ५ कि.मी.चे असून वळसा घेलेला रस्ता आहे.

या ११ मारुती शिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमयाचा मारुतीची स्थापना केली आहे.

खामगाव जवळ नांदुरा येथे हनुमंताची एकशे पाच फूट उंच मूर्ती आहे. २००१ साली या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या ठिकाणी खूप भाविक व पर्यटक दर्शनाला येत असतात .

एकदा तरी आपण ११ मारुतीचे,तसेच ईतरही मारुतीचे दर्शन घ्यावे. दर्शन करावे

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मारुती मंदिर आहेत जळगाव येथील दक्षिण मुखी मारुती, जळगाव जिल्ह्यातील बोदवड तालुक्यातील शिरसाळा येथील मारुती मंदिर, तसेच नाशिक,पुणे, मधील बरेच मारुतीची मंदिरे प्रसिद्ध आहेत. त्या ठिकाणीही हनुमान जन्मोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

बलोपासनेचे महत्व सांगण्यासाठीच समर्थ रामदास स्वामींनी या अकरा मारुतीची स्थापना केली. तसेच श्रीरामा प्रति हनुमंताची असलेली निष्ठा होती तीच निष्ठा व भाव आपल्यातही उतरावा हाच त्यामागचा उद्देश होता. संकटकाळी हाच श्रद्धा भाव आपल्याला प्रेरणा देतो..

संकटमोचक हनुमंताला आपणही सतत येत असलेले संकट,नैसर्गिक आपत्ती निवारण्यासाठी प्रार्थना करु.

।।संकट कटै मिटे सब पीरा, जो सुमिरे हनुमत बलबीरा ।।

।। श्री हनुमतेय नमः ।।

- दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव
मोबा.८९९९५६६९१७

धाराशिव लोकसभा सार्वत्रिक निवडणूक १९ लक्ष ९२ हजार मतदार बजावणार

अक्षराज : संगिता वनकळस

दि.२१, कळंब (धाराशिव) : १८ व्या लोकसभेसाठी ७ मे रोजी धाराशिव लोकसभा मतदारसंघात सार्वत्रिक निवडणुकीसाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे.१९ एप्रिल २०२४ रोजी अद्ययावत करण्यात आलेल्या मतदार यादीतील मतदार संख्येनुसार या निवडणुकीत १९ लक्ष ९२ हजार ७३७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.यामध्ये १० लक्ष ५२ हजार ९६ स्त्री, ९ लक्ष ४० हजार ५६० पुरुष आणि ८१ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

४० - धाराशिव लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील उमरगा, तुळजापूर, धाराशिव व परांडा या विधानसभा मतदारसंघासोबतच शेजारच्या लातूर जिल्ह्यातील औसा विधानसभा मतदारसंघ आणि सोलापूर जिल्ह्यातील बार्शी विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

जिल्ह्यातील उमरगा विधानसभा मतदारसंघात ३१५ मतदान केंद्र आहे. या मतदारसंघात १ लक्ष ६४ हजार ५०० स्त्री,१ लक्ष ४६ हजार १९३ पुरुष आणि दहा तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष १० हजार ७०३ मतदार, तुळजापूर विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९८ हजार ५१७ स्त्री,१ लक्ष ७७ हजार ३९ पुरुष व ६ तृतीयपंथी अशी एकूण ३ लक्ष ७५ हजार ५६२ मतदार ४०६ मतदान केंद्रात मतदान करतील.

धाराशिव विधानसभा मतदारसंघात ४१० मतदान केंद्र असून १ लक्ष ९२ हजार ९५७ स्त्री, १ लक्ष ७२ हजार ९७७ पुरुष आणि १७ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष ६५ हजार ९५१ मतदार,परंडा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ७३ हजार १४६ स्त्री, १ लक्ष ५२ हजार १३ पुरुष व ६ तृतीयपंथी अशी एकूण ३ लक्ष २५ हजार १६५ मतदार हे ३७२ मतदान केंद्रावर मतदान करतील.

औसा विधानसभा मतदारसंघात ३०७ मतदान केंद्रावर १ लक्ष ५६ हजार ४७९ स्त्री,१ लक्ष ३७ हजार ६०४ पुरुष व ३ तृतीयपंथी असे एकूण २ लक्ष ९४ हजार ८६ मतदार तर बार्शी विधानसभा मतदारसंघात ३२९ मतदान केंद्र असून १ लक्ष ६६ हजार ४९७ स्त्री,१ लक्ष ५४ हजार ७३४ पुरुष तर ३९ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष २१ हजार २७० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.

अक्षराज कविकट्टा

महावीर..

तेवीसावे धर्म रक्षक
तीर्थंकर रे पार्श्वनाथ
चातुर्याम धर्म सांगे
चार तत्वे आत्मसात

अहिंसा सत्य अस्तेय
ठसवे विचार मनात
संयम करूणा शील
प्रसार करती जनात

ब्रह्मचारी ते महावीर
विश्वासले सत्कर्मात
रूपांतरी करी सार्थ
पंचयामी या धर्मात

अनेकांत वादाचा रे
तथ्य आणे विचारात
स्याद्वादाचे पुरस्कार
कृत्य आणे आचारात

चार तीर्थे स्थापियले
तीर्थंकर रे म्हणतात
त्याग प्रेम न् सदाचार
सत्व तत्व जाणतात

सहज समजावे धर्म
अर्धमागधी याभाषेत
महिलांनाहीअधिकार
समाज ये एक रेषात

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

वाचक पत्र

सुट्टीत मुलांना वेळ द्या !

समस्त शाळकरी मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून आता उन्हाळी सुट्टी पडली आहे. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळत असे. आता मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये त्यांची पुरती दमछाक होत आहे. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र काही पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात. मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात. याखेरीज मुलांच्या कोवळ्या डोळ्यांवर या मोबाईल्स आणि टीव्हीच्या किरणांचा परिणाम होऊन त्यांची दृष्टीक्षमता अल्प होते. यासाठी मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना विविध संस्कार, क्रीडा आणि शौर्य शिबिरांना पाठवा. त्यांच्यासाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक पाठांतर करून घ्या. देवतांचे अवतार, क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगा. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या !

- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई

बुधवार पेठेत बांगलादेशी घुसखोर

दि.२१, पुणे : बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत गेल्या बारा वर्षांपासून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी घुसखोर महिलांना गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने पकडले. या प्रकरणी फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मासुका कलाम फकीर उर्फ शेख (वय २५), पिया नाझमुल सरदार उर्फ शेख (वय २७), रुजी हारून शेख (वय ३८), रूपा आकाश मंडोल (वय ४०, सध्या रा. बुधवार पेठ, मूळ, रा. बांगलादेश) अशी कारवाई करण्यात आलेल्या बांगलादेशी महिलांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध फरासखाना पोलीस ठाण्यात पारपत्र अधिनियम, तसेच परकीय नागरिक आदेश कायद्यातील कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

तीर्थंकर भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी

अक्षराज : राजेश पुरी

दि.२१, कळंब (धाराशिव) : अहिंसेचा मार्ग दाखवून जगाला शांतीचा संदेश देणारे, जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती कळंब येथे मोठ्या उत्साहात साजरी केली.

जैन समाजाच्या वतीने आयोजित रॅलीमध्ये सहभाग घेऊन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच श्री १००८ महावीर दिगंबर जैन मंदिर महावीर येथे कळंब जैन समुदायासोबत उपस्थित राहून समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी मेघ राणाजगजितसिंह पाटील, भाजपा तालुका अध्यक्ष अजित पिंगळे, बाबू लोढा, संतोष एखंडे, हर्षद अंबुरे, येश सुराणा, संजय मालपाणी सर्व यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फलटण येथे भगवान महावीर जयंतीनिमित्त मतदान जनजागृती संपन्न

अक्षराज : भारत खुटाळे

दि.२१, फलटण (सातारा) : दि.२१ एप्रिल २०२४ रोजी फलटण येथे sveep अंतर्गत भगवान महावीर जयंतीनिमित्त औचित्य साधनु मतदारामध्ये मतदानाबाबत जनजागृती उपक्रम घेण्यात आले.

माढा लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने २५५ फलटण (अ.जा) विधानसभा मतदार संघा मधील मतदान टक्का वाढवण्यासाठी मतदार जनजागृती चे काम सुरू आहे.

भगवान महावीर जयंतीनिमित्त औचित्य साधनु मतदारा मध्ये मतदाना बाबत जनजागृती उपक्रम घेण्यात आले होते. मतदान जनजागृती घोषवाक्य व मतदान शपथ घेण्यात आले.

भाटशिरपुरा शाळेत प्रवेश पत्र विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत

अक्षराज : मुक्ता गिरी

दि.२१, कळंब : कळंब तालुक्यातील भाटशिरपुरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिलीच्या वर्गात प्रवेश पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना पहिलीत प्रवेश देऊन औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण तांबारे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या सोहळ्यात शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीमती प्रियंका ताई गायकवाड व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेश उत्सवास गावातील २५ प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली मध्ये प्रवेश देण्यात आला. इयत्ता ७ वीच्या विद्यार्थिनींनी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थी आनंदी राहावे त्यासाठी शाळेची व शाळेच्या परिसराची सजावट करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक विकास, भाषा विकास, गणनपूर्व तयारी या क्षमतांची चाचणी घेण्यात आली. यासाठी शाळा स्तरावर एकूण ७ टेबल तयार करण्यात आले होते, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वर्गशिक्षिका श्रीमती प्रमोदिनी होळे, अमोल बाभळे, श्रीकांत तांबारे, सचिन तामाने, शहाजी बनसोडे, लिंगराज सुरवसे, राजाभाऊ शिंदे, रंजना थोरात यांनी परिश्रम घेतले.

तिच्या नजरेत गुन्हेगार झालो..

प्रेमाचे संदेश मी देणारच होतो...
मनात कोरलेल्या भावना,व्हाट्सअँपवरपाठवणारच होतो.
विकृतांनी तिच्या माऊलीला चुगली निरोप देऊनचॅलेंज
मला दिलेले कळलेच नाही..

भोंदू बाबा कंटकांनी देखील जोगवा मागितला.
तिच्या माय माऊलीने देखील अंधश्रद्धेला भीक दिली.
ओझे मी ओडून घेतले...पण मला काय माहित कीमाझेच
हात जळणार होते.

एकीकडे आठवणीची मी ओझे वाहत होतो.
दुसरीकडे ती मला पाहून रस्त्यावर थुंकत होती.
काळ वसुलीला उतरलेले दिसत होते.खरे प्रेमाचे मूल्य मला
कळत होते.

आता करू तरी काय तिच्या मायमाऊलीनेलग्न ठरलेले
मेसेज जे दिले होते.
शरीर तीचे पणतीच्या ज्योत सारखे जीव माझा जळत होता.
तिच्या माय माऊलीला वचन दिले होते.नाहीतर मी पुन्हा
मेसेज करून,तिच्या नजरेसमोर गुन्हेगार होणारच होतो.
संस्काराने जग जिंकता येतं अहंकाराने
जिंकलेले हरवता येते.

रस्त्यावर मी तिला थांबवले असते.
पण माऊलीच्या डोळ्यात अश्रू आले असते.
प्रेम करतो, तिला मी सांगू तरी आता कसे..?

- प्रणिल कुसाळे
९९२२८६२७६१

साप्ताहिक राशी भविष्य दि. २२ ते २८ एप्रिल २०२४

मेष रास -

हा सप्ताह तुमच्यासाठी तसा मिश्र सप्ताह ठरणार आहे. मनामध्ये थोडी बेचैनी व घबराट जाणवेल. तुमचे आरोग्यही खराब होण्याची शक्यता आहे. पण ऍडमिशन, व्यवसाय, नोकरी या प्रकारची काही कामे असतील तर ती पूर्ण होतील. लोन मात्र काढू नका. विदेशाशी संबंधित कामे सांभाळून करा. शक्यतो प्रवास टाळा प्रवासात स्वास्थ्याचा काही त्रास होऊ शकतो. एखादी प्रॉपर्टी किंवा वाहन खरेदी करण्याचे देखील योग आहेत. त्यामुळे परिवारातील वातावरण आनंदी असेल, मन प्रसन्न राहील व धनयोगही उत्तम संभवतो

वृषभ रास -

हा सप्ताह तुमच्यासाठी ही मिश्रा स्वरूपाचा सप्ताह ठरणार आहे. मानसिक रित्या थोडी चलबिचल असेल. घरातील व्यक्तींची अथवा कुणाशीही भांडणे करू नका.पण हाती घेतलेली सर्व कामे पूर्ण होतील. प्रेम संबंध असतील तर त्याचे रूपांतर लग्नात होईल. तुमच्या वरिष्ठांसोबत तुमच्या कामा संबंधित चर्चा, सल्लामसलत करा. परदेशाशी संबंधित काही कामे असतील तर ती पूर्ण होतील. प्रवासही सुखाचे होतील. नवीन नोकरीच्या शोधात असाल तर नवीन नोकरी मिळेल, धनलाभही होईल. पण सर्व कामे योजना आखूनच पूर्ण करा.

मिथुन -

हा सप्ताह तुमच्यासाठी थोडासा प्रतिकूल स्वरूपाचा असेल. तुमचे स्वास्थ्य खराब होण्याची शक्यता आहे. तुमच्या कामांमध्ये कोणाशीही फ कटची दुश्मनी ओढवून घेऊ नका. या सप्ताहात पैशांची प्राप्ती थोडी कमी होईल. पण कामा संबंधित मोठे प्रवास होतील. व त्यातून पैसा संबंधित कामे पूर्ण होतील. तुमच्या भावंडांसोबतही तुमचे चांगले संबंध निर्माण होतील. परिवारातही आनंदाचे वातावरण असेल.

कर्क रास -

खूप दिवसापासून तुम्ही तुमच्या मुलांच्या व आई-वडिलांच्या तब्येतीच्या काळजीत होतात त्यातून आता मुक्ती मिळेल. स्वतःचे स्वास्थ्य मात्र सांभाळा.मेडिटेशन करा. बिझनेस मध्ये पैसे मात्र गुंतवू नका. हा सप्ताह तुमच्यासाठी छान असेल आनंदी ही राहाल पण प्रवासात त्रास होईल. प्रवास टाळा. खर्चही खूप होईल. प्रवास करणे अत्यंत गरजेचे असेल तर आपले खाण्यापिण्याचे सामान व औषधे घेऊनच प्रवासास निघा. लग्नाचे योग देखील समजतात. लग्न जुळून येईल अथवा जुळले असल्यास पूर्णत्वाला जाईल.

सिंह रास -

हा सप्ताह तुमच्यासाठी अगदी आनंदी आनंदाचा असेल. मोठा भाऊ किंवा तुमचे वडील यांच्याकडून तुम्हाला खूप फायदा होईल. रखडलेली सर्व सरका सरकारी कामे पूर्ण होतील. एखाद्या गोष्टीबद्दल मनामध्ये लालच निर्माण झाल्यास ती बाजूला ठेवा अन्यथा नुकसान होईल. वैवाहिक जीवनातील पार्टनर सोबत किंवा बिझनेस मधील पार्टनर सोबत वाद समजतात. धनसंचय करू शकाल. विदेशाशी संबंधित काही कामे असतील तर ती पूर्ण होतील.

कन्या रास -

या आठवड्यातील सद्यस्थिती तुमच्यासाठी खूप चांगली आहे. तुमच्या नशिबाने तुमच्या सुख सुविधांमध्ये वाढ होईल. प्रवासही होतील. त्याम धून मनःशांती मिळेल व पैशाचे सर्व प्रश्न सुटतील. आनंदी राहण्याचा प्रयत्न करा.

तुला रास -

हा सप्ताह तुमच्यासाठी ही मिश्र स्वरूपाचा सप्ताह ठरणार आहे. तुमचे स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता आहे. मनामध्ये चलविचल तथा बेचैनी वाढेल. खर्चही वाटली त्यामुळे नको असलेले खर्च टाळा. शेअर मार्केट किंवा स्टॉक मार्केटम ध्ये काम करत असाल तर हा सप्ताह अतिशय उत्तम आहे. लग्न जुळून येईल अथवा होईल. कर्ज पण भेटतील पैशाची व प्रॉपर्टीची सर्व कामे पूर्ण होतील. वडिलांचे स्वास्थ्य खराब असेल तर तेही आता चांगले होईल. बँकांची रिलेटेड काही व्यवहार कामे असतील तर पूर्ण होतील. धार्मिक यात्रा होतील.

वृश्चिक रास -

या सप्ताहात तुमची राखडलेली सर्व कामे पूर्ण होतील. घरातील वरिष्ठांची तब्येत स्वास्थ्य खराब असेल तर ते आता हळूहळू सुधारू लागेल. सरकारी नोकरी मिळेल.सरकारी कामे पूर्ण होतील. या सप्ताहात धनलाभ ही उत्तम होईल पण घुम णे फिरणे थोडे कमी करून कामावर लक्ष द्या. वैवाहिक किंवा व्यवसायिक जीवनातील येणाऱ्या संकटांवर जास्त विचार करत बसू नका. विवाद टाळा.

धनु रास -

या सप्ताह तुमचे प्रेम संबंध काही विशिष्ट आले असेल तर सुधारतील. पण धन संबंधित काही अडचणी असतील तर तुम्ही त्यावर मातही कराल. रखडलेली सर्व कामे पूर्ण होतील. विवाह उत्सुक असाल तर विवाह ठरतील. तुमच्या आईकडून तुम्हाला काही फायदा होईल. या सप्ताहात तुम्हाला सुख ज्ञान वाहनवृद्धी धनलाभ हे सर्व मिळेल पण खर्चही वाढेल. प्रेम संबंधात भांडणे होण्याचे देखील योग आहेत उच्च रक्तदाब होण्याची शक्यता आहे प्रवास टाळा.

मकर रास -

हा सप्ताह तुमच्यासाठी खूप छान सप्ताह आहे. आतापर्यंतची तुमची सर्व परिस्थिती सुधारेल. व्यापारामध्ये व नोकरीमध्ये वृद्धी होईल. विदेशाशी संबंधित काही कामे असतील तर ती पूर्ण होतील व त्यातही फायदाच होईल. व्यापारातील पार्टनर व लाइफ पार्टनर या दोघांकडून तुम्हाला फायदा होईल.

कुंभ रास -

या सप्ताहात तुम्हाला अचानक एखादा मोठा आधार मिळेल. व्यवसाय नोकरीत लाभ होतील

रखडलेली मोठी कामे पूर्ण होतील. ज्यांना काम नसेल त्यांना काम मिळेल. लहान भावंडांकडूनही फायदाच होईल. अचानक भाग्य खुलेल. खूप दिवसापासून ची असलेली मानसिक बेचैनी आता संपेल. लाभ होतील. स्वास्थ्य थोडे सांभाळा. वडीलधाऱ्या माणसांची तुम्हाला साथ मिळेल. लोन काढण्याचा विचार असेल तर लोणही मिळेल आणि नवीन नोकरीच्या शोधात असाल तर नवीन नोकरी मिळेल.

मीन रास -

या सप्ताहात तुमचे स्वास्तिक खूप छान असेल पण तुमच्या मनामध्ये कुठल्यातरी गोष्टीविषयी लालूच निर्माण होईल. मौज मजा मस्ती करावीशी वाटेल आणि तुम्ही ती कराल ही. वादातून मुक्ती ही मिळेल. अचानक धनलाभ होईल. प्रेम संबंधाचे रूपांतर लग्नामध्ये होईल. तुम्ही अचानकपणे या सप्ताहात रोमँटिक देखील घाल. प्रवासाचेही उत्तम योग आहेत. पण प्रवासात मात्र काही खाऊ नका. पैशाची सर्व कामे पूर्ण होतील त्यामुळे मानसिक शांती ही लाभेल.

- देवयानी कुलकर्णी
खारघर/रायगड

पृथ्वी आहे, म्हणूनच मनुष्याचे अस्तित्व आहे !

वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्र २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी- संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात. महाभारतामध्ये भारताच्या वर्णनाप्रमाणेच जगातील अन्य भौगोलिक स्थळांचे वर्णन आढळते. उदा. मंगोलियाचे गोबी वाळवंट, इजिप्तची नाईल नदी, लाल समुद्र इत्यादी इत्यादी. तसेच महाभारतातल्या भीष्म पर्वातील जम्बुखंड- विनिर्माण पर्वात संपूर्ण पृथ्वीचे मानचित्र सांगितले आहे. ते असे-

सुदर्शनं प्रवक्ष्यामि द्वीपं तु कुरुनन्दन।
परिमण्डलो महाराज द्वीपोसौ चक्रसंस्थितः।।
यथाहि पुरुषः पश्येदादर्शे मुखमात्मनः।
एवं सुदर्शनद्वीपो दृश्यते चन्द्रमण्डले।।
द्विरंशे पिप्पलस्तत्र द्विरंशेच शशो महान्।।

याचा अर्थ- हे कुरुनन्दन! सुदर्शन नावाचे हे द्वीप चक्राप्रमाणे गोलाकार स्थित आहे. ज्याप्रमाणे पुरुष आरशात आपला चेहरा बघतो, त्याचप्रमाणे हे द्वीप चंद्रावरती दिसते. याच्यातील दोन अंशांमध्ये पिंपळाची पाने आणि दोन अंशांमध्ये मोठा ससा दिसतो.

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पर्यावरण रक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने फडकविला जातो. अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला. तरीही त्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय समन्वयक असलेले डेनिस हेस यांनी स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन केले व पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सद्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूर्यापासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे.

पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झालीअसावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूर्वीपासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६ किमी एवढा आहे. सूर्यापासून तिचे अंतर साधारणपणे १४,९५,९७,८९० किमी एवढे आहे.

पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६५ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वतःभोवती फिरण्याच्या आसापासून २३.५ अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वतःभोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वच्छ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणत: ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूर्यापासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वतः चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूर्यापासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्भूत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते. पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यतः महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्रोत जसे- अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,९११.४ मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो.

जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते- एक वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा- वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या- वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल!

!! वसुंधरा दिनाच्या समस्त बुद्धिजीवी प्राण्यांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन वसुलेखन -
श्री. कृष्णकुमार निकोडे गुरूजी
मु. पो. ता. जि. गडचिरोली
भ्रमणध्वनी- ७७७५०४१०८६

ग्रामीण भागात यंदा चारा छावण्यांना परवानगी नाही ; चारा छावणीचा प्रस्ताव आचारसंहितेच्या कचाट्यात

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२१, अहमदनगर : राज्याच्या ग्रामीण भागात भिषण पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने जनावरांसाठी चाऱ्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. राज्यात सुमारे तीन कोटींहून अधिक जनावरे आहेत. या जनावरांना जगवण्यासाठी शेतकरी व राजकीय नेत्यांकडून चारा छावण्यांची मागणी होत आहे, पण चारा छावण्यांमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी यंदा चारा छावण्यांना परवानगी न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना थेट मदत करण्याचा विचाराधीन असलेला प्रस्ताव लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कचाट्यात लटकणार आहे. राज्यातल्या धरणांमधील पाणीसाठ्यात घट झाल्याने टँकरच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होत आहे. परिणामी उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात चाऱ्याची टंचाई जाणवू लागल्याने या भागात चारा डेपो, चारा छावण्या सुरू करण्याची मागणी शेतकरी आणि लोकप्रतिनिधींकडून होत आहे. सध्या निवडणुकीच्या हंगामात आणि आचारसंहितेमुळे चारा छावण्यांना परवानगी दिल्यास त्यावरून राजकारण, भ्रष्टाचाराचे

आरोप - प्रत्यारोप आणि सरकारची बदनामी होईल अशी भीती आहे. राज्यात ३ कोटी २९ लाख जनावरे असून संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पशुसंवर्धन विभागाने काही महिन्यांपूर्वीच चारा निर्मितीसाठी शेतकऱ्यांना १७३ मेट्रिक टन बियाणे दिले. त्यातून २७ लाख ७१ हजार टन चारा जमा झाला. सध्या हा चारा पुरेसा आहे. मात्र हा चारा शेजारील राज्यात नेऊन विकला जात असल्याने यंदा जिल्हा बाहेर चारा वाहतुकीस बंदी घालण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

तथापि, चारा छावण्या सुरू करण्याऐवजी शेतकऱ्यांना चाऱ्यासाठी थेट खात्यात अनुदान देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. मात्र निवडणूक आचारसंहितेच्या (कचाट्यात) नावाखाली थेट मदतीचा निर्णयही अडकला आहे. सरकारच निवडणुकीत अडकल्याने यावर मार्ग निघालेला नाही, असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

निलेश लंकेचा प्रचार केला म्हणून एकास बेदम मारहाण; गुन्हा दाखल

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२१, अहमदनगर : तु निलेश लंकेचा प्रचार का करतो, सुजय विखेंचा का नाही असे म्हणत चौघांनी एका तरुणाला लोखंडी गज, लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत त्याच्या हातावर ब्लेडने वार केल्याची घटना पाथर्डी तालुयातील राघू हिवरे ग्रामपंचायत कार्यालयासमोर गुरुवारी (दि.१८) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत सचिन नारायण होंडे (वय ३१, रा. राघू हिवरे, ता. पाथर्डी) यांनी गुरुवारी (दि.१८) पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

यामध्ये म्हंटले आहे की, गुरुवारी सकाळी ११.५८ च्या सुमारास आपण मी राघुहिवरे ग्रामपंचायत समोर उभा असताना आरोपी जबर ज्ञानदेव कुर्हे, गोरख शंकर लबडे व अनोळखी २ इसम असे चौघेजण तेथे आले व मला म्हणाले की तु लंके यांचा का प्रचार करतो असे म्हणत शिवीगाळ केली व पुढे म्हणाले की तु विखे यांचा प्रचार कर.

ते असे म्हणाले असता मी त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न करत असताना त्याचा त्यांना राग आल्याने गोरख शंकर लबडे यांने मला लोखंडी गजाने पोटावर व पाठीवर मारहाण केली व जबर ज्ञानदेव कुर्हे यांने माझे उजव्या हाताचे करंगळीवर ब्लेडने मारले व अनोळखी २ इसमांनी मला लाथाबुयाने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली.

मारहाणीमध्ये मी खाली पडलो असतांना जबर कुर्हे यांने माझे पॅन्टच्या उजव्या खिशातील ९ हजारांची रोख रक्कम काढून घेतली व जाताना म्हणाले की तु पुन्हा लंके यांचा प्रचार केलास तर तुझेवर छेडछाडीचा गुन्हा दाखल करीन अशी धमकी दिली आहे. असे या फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी चौघा जणांच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३२७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

कायदा अन, सुव्यवस्थेचे धिंडवडे निघतात कसे ? येरवडा परिसरात तरुणाची गोळ्या झाडून हत्या !

अक्षराज : प्रणिल कुसाळे

दि.२१, येरवडा (पुणे) : अग्रेसन हायस्कूल येरवडा येथे ७ ते ८ तरुणांनी समोरून पोटात गोळ्या झाडल्या. या गोळीबारात विकी चांडालिया (वय २७, रा. येरवडा जय जवान नगर) याचा मृत्यू झाला. पुण्यातील येरवडा परिसरा दि.१९ रात्री १ दरम्यान हा गोळीबार करण्यात आला.

जुन्या वादाचा राग मनात धरून गोळ्या झाडण्यात आल्याचे समजते. आकाश चंदाले व त्याच्या साथीदाराने विकी चंदाले याच्यावर गोळीबार केला आहे. गोळीबार करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे प्रचंड खळबळ पुणे शहरात उडाली आहे. एकीकडे लोकसभा ची निवडणूक दुसरीकडे गोळीबार सारख्या घटना पुणे शहरात निवडणुकीच्या काळात होत आहे कायदा व सुव्यवस्था ची कुचुंबना प्रशासनाकडून झालेले दिसत आहे. स्थानिक पोलीस ठाणे नेमकं करते तरी काय येरवडा भागांमध्ये गोळीबार सारख्या घटनांची देखील पोलीसांना आगोदर कल्पना नाही.

या घटनेमुळे स्थानिकांमध्ये असुरक्षितेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे पोलीस दप्तरी नोंद असलेल्या गुन्हेगारांची देखील हालचाली वरती पोलिसांना अल्टिमेट नसते.

येरवडा बनला गुन्हेगारांचा अड्डा !

येरवडा नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध पोलिसांकडून कारवाईचा बडगा उगारला जात आहे. त्याअनुषंगाने परिमंडळ चारमधील सराईताना एकाचवेळी तडीपार करण्यात आले होते. त्यामुळे गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे. सराईतांसह

संघटीत गुन्हेगारी करणाऱ्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवत कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त यांनी दिले आहेत. पोलीस आयुक्तालयातंर्गत परिमंडळ चारच्या विविध पोलीस ठाण्यातंर्गत सराईतांविरुद्ध तडीपार कारवाई करण्यात आले आहे. त्यामध्ये खुनाचा प्रयत्न, दंगा, दुखापत, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, महिलांवरील अत्याचार, बेकायदा शस्त्र जवळ बाळगणे, अवैध जुगार चालविणे, अवैध दारुविक्री करणे व अंमली पदार्थ विक्री करणारे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेल्यांचा समावेश आहे.

संघटित गुन्हेगारी टोळ्या, गावठी कट्टयांचा, कोयता गँग सारख्या , खून, खूनासारखे प्रयत्न, व्हाट्सअप कॉल, व्हिडिओ कॉल, जीवे मारण्याची धमकी देणे भर रस्त्यात होणारे खून, उलटं टांगून मारणं एवढ्या पुरतंच मर्यादित राहिलं नसून आता संघटित गुन्हेगारी टोळ्या चालविणारे, पोलिस ठाण्याच्या आवारात खून करणारे सराईत गुंड हे न्यायालयाच्या आदेशाचं उल्लंघन करून बाहुबलीसारखे रॅली, मिरवणूक काढतात, रात्र रात्री देखील टोळी नी चौकात थांबून गुन्हेगारी वृत्तीचा देखावा करतात. गुन्हेगारी मानसिकतेचं उदात्तीकरण करतात. त्यावेळी पोलिस दल खिशात हात घालून बघत बसते.

महाराष्ट्रात असलेल्या काही कायद्यामुळे उत्तरेतील बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आदी राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र पोलिसांची बाहू अधिक बळकट झालेली होती.

पिंपरी शहरातील हजारो कोकणी बांधवांचा १०० टक्के मतदानाचा निर्धार..

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२१, पिंपरी (पुणे) : शहरात वास्तव्य करणा-या सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाच्या हजारो कोकणी बांधवांनी आम्ही भारताचे नागरिक, लोकशाही निष्ठा ठेवून, मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनात बळी न पडता मतदान करू

अशी शपथ घेऊन १०० टक्के मतदानाचा निर्धार व्यक्त केला.

पिंपरी विधानसभा कार्यालयाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आज कार्यक्षेत्रात मतदान जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला.

पिंपरी येथील संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदीर येथे सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाच्या वतीने वधू- वर मेळावा आयोजित करण्यात आलेला होता.

त्या कार्यक्रमात शहरातील हजारो मतदारांनी मतदानाची शपथ घेतली.यावेळी नोडल अधिकारी मुकेश कोळप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच मंडळाचे अध्यक्ष अजय पाताडे,प्रमोद राणे,परषुराम प्रभू, दिपज्योती सावंत उपस्थित होत्या.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जवळपास ६ हजाराहून अधिक कुटुंबे शहरात वास्तव्य करतात, मतदारांची संख्या २० हजारांच्या जवळपास आहे यामध्ये नवोदीत मतदारांचाही समावेश आहे.

यावेळी सर्वांनी १३ मे रोजी होणा-या लोकसभा निवडणूकीत मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला. नवोदीत मतदार मनाली पाताडे यांनी नवोदीत इतर मतदारांसह सर्वांना मतदान करण्याचे आवाहन केले.

श्री साईबाबा पालखी शोभायात्रेत हजारोच्या संख्येत उसळला जनसागर

अक्षराज : दिवाकर घेर

दि.२१, नागपूर : भानेगाव येथून निघणाऱ्या श्री साईबाबा पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेत अपेक्षेप्रमाणे हजारोच्या संख्येत जनसागर उसळला होता. शोभायात्रेत सर्वधर्म समभाव देखावे सामील करण्यात आले होते. सदर शोभायात्रेत घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांची झाकी आकर्षणाचे केंद्र ठरली होती.

१७ एप्रिल २००७ ला रामनवमीच्या तिसऱ्या दिवशी भानेगाव येथील श्री साई मंदिरात श्री साईबाबांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. दरवर्षी प्रमाणे यंदाही २० एप्रिल शनिवारला सायंकाळी ६.३० वाजता श्री साईबाबा पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री साई मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

याप्रसंगी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड, उपमुख्य अभियंता विराज चौधरी, प्रवीण, रोकडे, सुरक्षितता अधिकारी उमेश ढोक, पोलीस निरीक्षक धनाजी जळक, श्री मंदिराचे अध्यक्ष डोमाजी निखाडे, सचिव क्रिष्णा चिकनकर, माजी सरपंच रवींद्र चिखले यांच्या हस्ते आरती व श्री साई पालखीची विविधत पूजा अर्चना करण्यात आली.

यावेळी श्यामराव सरोदे, रामेश्वर ढोके, सुनील जालंदर, अनेस चवरे, राज तांडेकर, शंकर बोढे, अरुण निखाडे, राजू येलमुले, विलास महल्ले, बापू शिंदूरकर, दीपक शिंदूरकर, नामदेव ढोके, निळकंठ शिंदूरकर, योगेश जालंदर, नितीन इंगोले, अरविंद चिकनकर, नितीन मोहिते, वसंता ढोके, आदि उपस्थित होते.

शोभायात्रेला मान्यवरांनी हिरवी झेंडी दिली. शोभायात्रा साई मंदिर भानेगाव, शिक्षक कॉलनी, उपासे ले-आऊट, नवीन बिना, राम मंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी, मुख्य बाजारपेठ, अन्नामोड आदि परिसरातून भ्रमण करून साई मंदिर भानेगाव येथे समारोप करण्यात आला. शोभायात्रेत श्री साईबाबा, राम, लक्ष्मण, सीता, हनुमान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाई, शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, बाजीराव पेशवे, बाजीप्रभू देशपांडे, झासी राणी, जीजा माता, मुरारबाजी देशपांडे, संभाजी कावजी कोंढाळकर, सिदोजी निंबाळकर, मावळे, राजस्थानी वेशभूषेतील नागरिक आदी सजीव पात्र सामील करण्यात आले होते. शिवाय राम, शिवाजी महाराज, कृष्ण, विठ्ठल रुख्मिनी आदी सजीव झाक्या सामील करण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत ११ घोडे, २ उंट, १० डिस्को लाईट बग्गी, बाभूळगाव बँड, लेजिम पथक, भजन मंडळ आदी सामील करण्यात आले होते.

शोभायात्रेचे ठीकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. सामाजिक व राजकीय संघटनाकडून शरबत, पाणी, आलूभात, लस्सी, मठ्ठा, बुंदी, आईस्क्रीम आदि वितरण करण्यात येत होते. शोभायात्रा मार्गावर शेकडोंच्या संख्येत नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली होती. यावेळी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली. शोभायात्रेत घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आकर्षणाचे केंद्र ठरले होते. शोभायात्रेत सजीव पात्र तयार करण्यासाठी मीनल पौणिकर रजनी भारती, निष्ठा दारूडकर, दीप्ती पिंजारे, खुशी आदींनी सहकार्य केले.

मावळ, शिरूरमध्ये तिरंगी लढत; वंचितकडून 'यांना' उमेदवारी जाहीर

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२१, पिंपरी (पुणे) : मावळ आणि शिरूर लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. वंचित बहुजन आघाडीने मावळमधून माधवी जोशी यांना तर शिरूरमधून आफताब अन्वर मकबूल शेख यांना शनिवारी (२० एप्रिल) उमेदवारी जाहीर केली आहे.

मावळ, शिरूर लोकसभा मतदारसंघाठी गुरुवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. परंतु, वंचितने अद्याप उमेदवार जाहीर केला नव्हता. कर्जत येथील माधवी

जोशी या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु, महाविकास आघाडीत मावळची जागा ठाकरे गटाला सुटली. त्यामुळे जोशी यांनी शनिवारी वंचितमध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळविली. महायुतीकडून खासदार श्रीरंग बारणे, महाविकास आघाडीकडून माजी महापौर संजोग वाघेरे आणि वंचितच्या माधवी जोशी यांच्या उमेदवारीमुळे तिरंगी लढत होणार आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली होती.

परंतु, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे आणि बारामतीत पक्ष विरोधी भूमिका घेतल्याने बांदल यांची उमेदवारी रद्द करण्यात आली होती. आता आफताब अन्वर मकबूल शेख यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी जाहीर केली आहे.

त्यामुळे शिरूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव आढळराव-पाटील आणि वंचितच्या शेख यांच्यात तिरंगी लढत होईल.

कळंबोलीतील ८ हजार विजग्राहक सात तास विजेविना

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, पनवेल : कळंबोली परिसरामधील ३५ हजार वीज ग्राहकांपैकी ८ हजार वीजग्राहकांना शनिवारी सकाळपासून ते सायंकाळी पावणेसहा वाजेपर्यंत विजेविना राहावे लागले. जेसीबीचे काम सूरु असताना विज वाहिनी तुटल्याने दिवसभर विज गायब होती. सकाळपासून सायंकाळपर्यंत विजवाहिनीचे दुरुस्तीचे काम सूरु असल्याने निम्या कळंबोलीकरांना विजेविना रहावे लागले.

पनवेल महापालिकेचे कळंबोलीत अमर रुग्णालय ते रोडपाली विसर्जन तलाव या रस्त्याचे काँक्रीटकरणाचे काम सूरु आहे. हे काम सूरु असताना शनिवारी सकाळी पावसाळी नाल्यातून महावितरण कंपनीने टाकलेल्या वीजवाहिनीला जेसीबीचा धक्का लागल्याने दोन ठिकाणी विजवाहिनी तुटली. कोणतीही जीवित हाणी झाली नाही. मात्र या वीजवाहिनीवर ८ हजाराहून अधिक वीज ग्राहक असल्याने सर्व ग्राहकांना विजेविना रहावे लागले. पनवेल महापालिकेच्या कंत्राटदाराच्या जेसीबी ऑपरेटरच्या चुकीमुळे हा अपघात झाला असल्याने सायंकाळी पावणेसहा वाजेपर्यंत वीजवाहिनीला जोड मारण्याचे काम सुरु होते.

वीज नसल्याचा सर्वात मोठा फटका उन्हाळ्यात वीज ग्राहकांना सहन करावा लागला. पालिकेचे वीज विभाग दुरुस्तीचे काम करत होते. मात्र नेमकी किती वाजेपर्यंत वीज परत येईल याचे उत्तर वीज महावितरण कंपनी आणि पनवेल महापालिकेचे अधिकारी उत्तर देऊ शकत नव्हते.

महावितरण कंपनीने कळंबोलीतील वीजवाहिनी गटारे व पावसाळी नाल्यातून टाकल्याने भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वऱ्हाडाच्या बसला आग ४२ प्रवासी सुखरुप

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.२१, लोणावळा : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली बाह्यवळणाजवळ मध्यरात्री वऱ्हाडाच्या बसला आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

बसला आग लागल्यानंतर ४२ प्रवासी तातडीने खाली उतरल्याने मोठी दुर्घटना टळली. आगीत बस पूर्णपणे जळाली. द्रुतगती मार्गावरून मध्यरात्री सव्वादोनच्या सुमारास प्रवासी वाहतूक करणारी खासगी बस पुण्याकडे निघाली होती. खंडाळा घाटातील खोपोली बाह्यवळण परिसरात बसने अचानक पेट घेतला.

बसमधील चालकाच्या लक्षात हा प्रकार आला. त्यावेळी काही प्रवासी गाढ झोपेत होते. प्रवासी आणि बसचालक तातडीने बसमधून बाहेर पडल्याने गंभीर दुर्घटना टळली. या घटनेची माहिती मिळताच खोपोली अग्निशमन दलाचा बंब, देवदूत पथक, बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणा, खोपोली पोलीस ठाण्यातील पथक, डेल्टा पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. पहाटे साडेतीनच्या सुमारास आग आटोक्यात आली. बसला आग लागल्यानंतर काही काळ घाटातील वाहतूक थांबविण्यात आली होती. आग आटोक्यात आणल्यानंतर पुण्याकडे जाणाऱ्या दोन मार्गिक वाहतुकीस खुल्या करण्यात आल्या. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. बसमधील ४२ प्रवासी, तसेच चालक सुखरुप असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

थोडक्यात बातम्या

सुरेश गणपत आंगणे यांचे दुःखद निधन

अक्षराज : भानुदास गायकवाड

दि.१९ (डोंबिवली) : मालवण तालुका येथील नहीवे गावचे सुपुत्र सुरेश गणपत आंगणे यांचे शुक्रवार, दि. १९ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास डोंबिवलीतील स्पर्श रुग्णालयात दुःखद निधन झाले.



ते ७७ वर्षाचे होते. त्यांच्या अचानक जाण्याने आंगणे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुले, सुना, नातू असा परिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवार, दि. १९ एप्रिल रोजी रात्री डोंबिवलीतील पाथर्ली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

कळंब येथे महावीर जयंती उत्साहात साजरी

अक्षराज : सतिश तवले

दि.२१, कळंब (धाराशिव) : कळंब येथे महावीर जयंती मिरवणुक जैन मंदिर, विठ्ठल मंदिर, बँक रोड डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, स्वातंत्र्य विनायक सावरकर चौकातून देवी रोड येथून जैन मंदिर येथे संपन्न झाली यावेळी सामाजिक संदेशाचे दर्शन झाले.

जगाला 'जिओ और जिने दो'चा संदेश देणाऱ्या भगवान महावीर यांची जयंती कळंब येथे रविवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने काढलेल्या मिरवणुकीतून जैनबांधवांनी सामाजिक एकोपा, अहिंसा, पर्यावरण संवर्धन, पाणी वाचवा, बेटी बचाव, शाकाहार याबाबत जनजागृती केली.

सकल जैन समाजातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून कळंब येथे महावीर जयंतीचा उत्सव एकत्रितपणे साजरा केला जातो.

खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर आमदार कैलास पाटील,मेघ राणाजगजितसिंह पाटील, तालुका अध्यक्ष अजित पिंगळे, तालुका अध्यक्ष शिवाजी अप्पा कापसे आदींची मिरवणुकीत उपस्थिती होती.

चौकाचौकात पिण्याचे पाणी, सरबत व्यवस्था करण्यात आली होती. मिरवणुकीनंतर सकल जैन समाजासाठी कंगळे परिवार कडून महाप्रसाद ठेवण्यात आला होता. उत्सवासाठी समितीचे हर्षद अंबुरे , संजय देवडा,बाबुशेठ लोढा, संतोष एखंडे, अनिल नाकील, अमोल बाभळे, लक्ष्मीकांत रामढवे,श्रीअंश पांगळ, प्रदीप संगवे, मिथुन साखरे नितीन साखरे दर्शन एखंडे शुभम सांगवे रमेश साखरे प्रकाश मांडवकर दीपक मांडवकर राजाभाऊ मांडवकर अनिल लोढा अनिल लोढा सुमित बलदोटा यश सुराणा अमोल लोढा, रोहन पारख, सुनील नाकील आदींसह पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आ.कैलास पाटील यांनी केली आंब्याच्या बागेची पाहणी

अक्षराज : संगीता वनकाळस

दि.२१,कळंब (धाराशिव) : मस्सा ता.कळंब येथे अवकाळी पावसाने व वादळी वाऱ्याने नुकसान झालेल्या शेतीपिकांची व फळबागेची लोकप्रिय खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास दादा पाटील यांनी पाहणी केली. मतदारसंघातील ज्या ज्या ठिकाणी शेतीपिकाचे, फळबागाचे, घराचे व दगावलेल्या जनावरांचे नुकसान झाले त्या ठिकाणी तात्काळ पंचनामे करण्याची जिल्हाधिकारी व जिल्हाअधिक्षक कृषी आधिकारी यांना लोकप्रिय खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी फोन करुन विनंती केली.

ओबीसी बहुजन पक्षाच्या उमेदवाराला ओबीसी समाजाचा पाठिंबा

ओबीसी समाजाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय

अक्षराज : वसंत रांधवण

दि.२१, अहमदनगर : मराठा आणि ओबीसी समाजामध्ये आरक्षणावरुन खदखद असताना त्याचे पडसाद लोकसभा निवडणुकीत उमटण्याची चिन्हे दिसत आहे. नुकतीच शहरात ओबीसी समाजाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यामध्ये ओबीसी बहुजन पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर झालेले नगर दक्षिण लोकसभेचे उमेदवार दिलीप कोंडिबा खेडकर यांना पाठिंबा देण्यात आला. दिलीप कोंडिबा खेडकर हे निवृत्त सनदी आयएस अधिकारी असून, त्यांच्या माध्यमातून एक सक्षम व सुशिक्षित उमेदवार पर्याय म्हणून नागरिकांना मिळाला आहे. प्रशासनातील माजी अधिकारी असलेले खेडकर यांना मताधिक्याने निवडून आणण्यासाठी ओबीसी समाजाच्या वतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे यावेळी बैठकीत प्रमुख पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.